ePaper
‘संजय राऊत यांना पण गुवाहाटीला यायचं होतं : शहाजी बापू

| वर्ष - 8 | अंक - 313 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- तुमच्यात स्पोर्ट्समन स्पिरिट कुठेय?
- संजय मांजरेकरांचा विराटला टोमणा?
- खामेनींची ३ दशकांची राजवट संपणार?
- इराणचा आणखी एक कमांडर ठार

www.mahaenews.com | रविवार, दि. 22 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मोशी-आळंदीतील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण अखेर रद्द

# No कत्तलखाना @ आळंदी!

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**कोणत्याही परिस्थितीमध्ये मोशी, आळंदी येथे कत्तलखाना होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली. हा परिसर म्हणजे श्रीसंत भूमी असून तो पवित्रच राहण्यासाठी महायुती सरकार वचनबद्ध आहे, असे ते म्हणाले. कत्तलखान्याचे हे आरक्षण रद्द व्हावे, यासाठी भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश दादा लांडगे यांनी केलेल्या पाठपुराव्यास मोठे यश मिळाले आहे.**





### महेशदादांचा रात्रंदिवस एकच ध्यास !

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी आणि तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल. वारकरी, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. आमदार महेशदादा लांडगे यांनी हे कत्तलखाना आरक्षण रद्द व्हावे, यासाठी रात्रंदिवस पाठपुरावा केला.

### फडणवीस यांचा वारकऱ्यांशी संवाद !

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांचा आषाढीवारी पालखी सोहळा पुण्यात दाखल झाला आहे. या ठिकाण फडणवीस यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी देखील काही जणांनी कत्तलखान्याचा प्रश्न उपस्थित केला, त्यावेळी फडणवीस यांनी श्री संत भूमी ही पवित्रच राहिली पाहिजे अशी भूमिका मांडली.

### भूमिपुत्रांचाही तीव्र विरोध

दोनच दिवसांपूर्वी, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रम मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला होता. या कार्यक्रमात मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याबाबत ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी फडणवीस यांना निवेदन दिले होते. तसेच, आ. महेशदादा लांडगे यांनीही महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आणि मुख्यमंत्र्यांकडे हे आरक्षण उठवण्याबद्दल आग्रही मागणी केली होती.

### महेशदादांची सकारात्मक भूमिकेची मागणी

मोशी, चऱ्होलीच्या नागरिकांची निवेदने स्वीकारा आणि त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती आ. लांडगे यांनी केली होती. त्यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे आणि ‘राजमाता, गोमाता तसेच भारतमाता’ यांचे पावित्र्य जपण्यासाठी ‘महायुती’ ने नेहमीच पुढाकार घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

### श्री क्षेत्र आळंदीजवळ कत्तलखाना ?

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आळंदी शहराजवळ कत्तलखान्याचे आरक्षण विकास आराखड्यामध्ये टाकण्यात आले आहे. त्यामुळे सर्व स्तरातून नाराजी व्यक्त झाली होती. प्रशासनाने हे आरक्षण हटवावे, यासाठी आ. लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला होता आणि त्यास मोठ्या प्रमाणावर यशदेखील आले आहे.

### फडणवीस नेमके काय म्हणाले?

पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले, की जो विकास आराखडा आहे, त्यामध्ये मोशी-आळंदी येथे कत्तलखान्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे. मात्र, कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही. त्याबाबतच्या आरक्षण वगळण्याच्या आदेश मी दिले आहेत. येथील ग्रामस्थांना, भूमिपुत्रांना, वारकऱ्यांना आणि वारकरी नेत्यांना सांगू इच्छितो, की कोणत्याही परिस्थितीत कत्तलखाना होणार नाही, आम्ही होऊ देणार नाही !

### आ. महेशदादा लांडगे यांची दूरदृष्टी...

देव-देश अन् धर्मासाठी काम करणारे भाजपा ‘महायुती’ चे सरकार राज्यात, केंद्रात आहे. गोरक्षण आणि गोसंवर्धनासाठी गोहत्या बंदीचा कायदा राज्यात लागू करण्याची भूमिकाच फडणवीस यांनी घेतली. टाळगाव-चिखली येथील टीपी स्कीम प्रशासनाने रद्द केली. त्यानंतर मौजे चऱ्होली येथील टीपी स्कीमला स्थगिती दिली. त्यावर काही लोकांनी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तर मुख्यमंत्र्यांनी जाहीर कार्यक्रमात एका मिनिटांत प्रश्न मार्गी लावला. मोशी ग्रामस्थ आणि गोरक्षक, हिंदुत्त्ववादी कार्यकर्त्यांनी कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याची मागणी केली होती. फडणवीस यांनी हा कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याचे आदेश दिले, याबद्दल त्यांचे तमाम गोरक्षण, गोसंवर्धक आणि शेतकरी यांच्यासह सकल हिंदू समाजाच्या वतीने मनापासून आभार व्यक्त करतो.

# एकही शब्द सरकार फिरविणार नाही!

## कर्जमाफीच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांची पुण्यात ग्वाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'या सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरविणार नाही,' अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली. उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आण श्री संत तुकाराम महाराज संस्थान यांच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त 'वारकरी भक्तीयोग' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. कर्जमाफीच्या मुद्द्याबाबत विचारले असता, 'कर्जमाफी कधी करायची याचे काही नियम आहेत, काही एक पद्धती आहे. हा निर्णयही सरकार उचित वेळी घेईल. या सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरविणार नाही,' असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.**



### धरण अभियंत्यांना दक्षतेचे आदेश

धरण परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे धरणांतून होत असलेला विसर्ग आणि पुराच्या धोक्याकडे लक्ष वेधले असता, 'धरणांवर नेमण्यात आलेल्या अभियंते आणि अधिकाऱ्यांना दक्षतेचे आदेश देण्यात आले आहेत,' असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

घरात कुजलेल्या अवस्थेत आढळला प्रसिद्ध अभिनेत्रीचा मृतदेह, एका आठवड्यापूर्वी निधन झाल्याची पोलिसांची माहिती

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जागतिक क्रमवारीत भरारी घेतली आहे. विद्यापीठातील प्राध्यापक भरतीसाठी शिक्षण विभागाकडून आवश्यक परवानग्या देण्यात आल्या आहेत. लवकरच विद्यापीठातील प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्ण करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महापालिकेचे नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, 'राष्ट्रीय पुस्तक न्यास'चे विश्वस्त राजेश पांडे, पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'योग ही आपली परंपरा, संस्कृती आहे. आनंददायी जीवनाची ही गुरुकिल्ली आहे. योग ही भारतीय चिकित्सा पद्धती आहे. शरीरासोबत मनालाही उभारी देण्याचे काम योगसनाच्या माध्यमातून होते. शरीराची रचना लक्षात घेऊन नखापासून केसापर्यंत आंतर्बाह्य अवयवांचा उपचार योगातून केला जातो.'

'यंदाच्या जागतिक 'योग दिना'ची संकल्पना 'वन अर्थ, वन हेल्थ' हा संदेश आपली वारकरी परंपरा प्रत्यक्षात जगते. पुण्याने आता वारीला नवीन रिंगण दिलेले आहे. आरोग्यदायी, स्वस्थ समाज निर्माण करण्याचा प्रयत्न सर्वांनी मिळून करू,' अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

### 'वारकरी योग' उपक्रमात सहभाग

मंत्री पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संजय चाकणे यांनी सूत्रसंचालन केले. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर, पालखी सोहळ्याचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे यांनी 'वारकरी योग' उपक्रमात सहभाग नोंदवला. डॉ. पल्लवी कव्हाणे आणि अनुराधा येडके यांनी योग संचालन केले.

# बेकायदा वीज जोड घेणाऱ्यांना अभय

## पथदिव्यांच्या तपासणीनंतर पुणे महापालिकेचा निष्कर्ष

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरातील विविध भागांत उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांना रस्त्यावरील पुणे महापालिकेच्या खांबांमधून सर्रास बेकायदा वीजजोडणी घेतली जात असताना पुणे महापालिकेच्या विद्युत विभागाने केलेल्या पाहणीत केवळ ८७ ठिकाणीच अशी वीजचोरी होत असल्याचे आढळले आहे!**




नाना पेठेतील इनामदार चौकात दोन आठवड्यांपूर्वी दिवंगत माजी नगरसेवक उदयकांत आंदेकर यांच्या नावाच्या फलकाला हात लागल्याने एका लहान मुलीला विजेचा धक्का बसून त्यामध्ये तिचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासात हा विद्युत प्रवाह अनधिकृतपणे घेण्यात आल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी पोलिसांनी शिवम आंदेकर याच्यावर गुन्हादेखील दाखल केला.विजेचा धक्का लागून झालेल्या या घटनेमुळे खडबडून जाग आलेल्या महापालिका प्रशासनाने शहरात बेकायदा पद्धतीने वीजजोड घेऊन फलक लावणारे, राजकीय कार्यालय थाटणारे आदींवर कारवाई करणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार सर्व अभियंत्यांना अनधिकृत वीजजोड शोधून ते काढून टाकण्याची कारवाई करावी, असे आदेश देण्यात आले. त्यानंतर पुणे महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीमध्ये ही तपासणी मोहीम राबविण्यात आली. त्यात नगर रस्ता क्षेत्रीय कार्यालय, कोथरूड- बावधन क्षेत्रीय कार्यालय, सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालय, वारजे- कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय आदींच्या हद्दीत दहापेक्षा जास्त वीजचोरीचे प्रकार आढळून आले. इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत हे प्रमाण कमी आहे.वीजचोरी केल्याप्रकरणी महापालिकेने कोणावरही गुन्हा दाखल केलेला नाही. त्यांनी घेतलेले वीजजोड तोडण्यात आले असून, पुन्हा असे प्रकार करू नका, असे बजावले आहे. पुन्हा वीजचोरी केल्याचे आढळल्यास गुन्हा दाखल केला जाईल. नाना पेठेतील इनामदार चौकात दोन आठवड्यांपूर्वी दिवंगत माजी नगरसेवक उदयकांत आंदेकर यांच्या नावाच्या फलकाला हात लागल्याने एका लहान मुलीला विजेचा धक्का बसून त्यामध्ये तिचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासात हा विद्युत प्रवाह अनधिकृतपणे घेण्यात आल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी पोलिसांनी शिवम आंदेकर याच्यावर गुन्हादेखील दाखल केला.विजेचा धक्का लागून झालेल्या या घटनेमुळे खडबडून जाग आलेल्या महापालिका प्रशासनाने शहरात बेकायदा पद्धतीने वीजजोड घेऊन फलक लावणारे, राजकीय कार्यालय थाटणारे आदींवर कारवाई करणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार सर्व अभियंत्यांना अनधिकृत वीजजोड शोधून ते काढून टाकण्याची कारवाई करावी, असे आदेश देण्यात आले. त्यानंतर पुणे महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीमध्ये ही तपासणी मोहीम राबविण्यात आली.

### कोणावरही गुन्हा दाखल केलेला नाही

त्यात नगर रस्ता क्षेत्रीय कार्यालय, कोथरूड- बावधन क्षेत्रीय कार्यालय, सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालय, वारजे- कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय आदींच्या हद्दीत दहापेक्षा जास्त वीजचोरीचे प्रकार आढळून आले. इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत हे प्रमाण कमी आहे.वीजचोरी केल्याप्रकरणी महापालिकेने कोणावरही गुन्हा दाखल केलेला नाही.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकीट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> "बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> "पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## संत सांगतील तसे वागावे



‘स्टेट’मेंन्ट
राहुल जगताप

ज्या स्थितीत परमात्मा ठेवतो त्यात आनंद मानावा. प्रपंचातल्या दु:खाबद्दल वाईट वाटून घेऊ नये. आपण जगात वागताना सर्व ‘माझे, माझे’ असे म्हणतो, पण प्रत्यक्ष आपल्या वाटणीला किती येते याचा कधी आपण विचार करतो का ? मिळण्याची आणि मिळविण्याची हाव वाढल्यामुळेच आपल्याला खरे दु:ख होते. ही हाव नाहीशी व्हायला भगवंताच्या स्मरणात राहणे हा एकच उपाय आहे. मी भगवंताचा आहे ही जाणीव ठेवून वागावे. भगवंताकडे चित्त गुंतवून ठेवणे हाच खरा धर्म मानावा. जगाला फसवू नये आणि जगाकडून फसले जाऊ नये. नामात जो राहिला तो सत्संगतीत राहिला. व्यवसाय आणि हौस याप्रमाणे आपण संगत धरतो. मनाची आणि नामाची संगत जोडून द्यावी. मालकाच्या बरोबर असलेला कुत्रा ज्याप्रमाणे धीट होऊन दुसऱ्यावर भुंकतो, त्याप्रमाणे आपण भगवंताच्या आधाराने राहावे; भुंकू मात्र नये, नेहमी लीनता ठेवावी. ‘मी’ साधन करतो हे विसरून जावे; त्याबद्दल अभिमान धरणे म्हणजे साधनाला कमीपणाच आणणे आहे. आपल्या कामात लक्ष ठेवून सर्वांशी प्रेमाने वागावे. स्त्री दीराचा किंवा सासू-सासऱ्यांचा मान ठेवते, ते नवऱ्याला खूश करण्याकरिता; तसे, भगवंताला ज्या रीतीने समाधान होईल, त्याप्रमाणे आपण वागावे. डॉक्टरला जर आपण ‘त्या काळ्या बाटलीतले औषध मला का देत नाही ?’ असे म्हटले तर तो ज्याप्रमाणे ‘तुला तो रोग नाही’ असे उत्तर देतो त्याप्रमाणे संत ज्याची त्याची वृत्ती ओळखून मार्ग सांगत असतात. याकरिताच संतांची संगत धरून, ते ‘सांगतील’ तसे वागावे; ते ‘वागतात’ तसे नाही वागू. आपल्या पतंगाची दोरी आपण संतांच्या हातात द्यावी आणि खुशाल निश्चिंत रहावे. आपण गुरूने सांगितलेले साधन करीत जावे, म्हणजे साधनात पुढे वाट दाखवायला तो उभाच असतो. जिथे दोन वाटा फुटतात, तिथपर्यंत या म्हणजे तिथे गुरू उभाच आहे. पण उगीच काही न करता ‘पुढे काय आहे ?’ हे विचारण्याने काय होणार? संतांनाच वेदांचा खरा अर्थ कळला. त्यांचे केवढे उपकार सांगावेत, की त्यांनी तो अर्थ आपल्याला सांगितला. म्हणून आपण वेद वाचण्याचे कारण नाही; आपण फक्त संत आपल्याला सांगतील त्याप्रमाणे वागावे. त्यात आपलेच घुसडू नये. आपले काम खात्रीने झालेच पाहिजे. पाणी गोठून बर्फ बनते, बर्फाच्या आत-बाहेर जसे पाणीच असते, तसे जो आत-बाहेर भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेला असतो त्याला संत म्हणतात. असे संत फक्त नामस्मरणाने जोडता येतात.

# आतापर्यंत लै बघितले, अरे जारे! मेळाव्यात फक्त..अरे ला कारे!



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**वंदनीय बाळासाहेबांच्या शिवसेनेत खूप पडली आणि प्रत्येक गोष्ट दोन ठिकाणी होऊ लागली..मग वर्धापन दिन मिळावे असोत, नाहीतर दसरा मेळाव्या असोत.. एक उद्धव ठाकरे यांचा तर दुसरा एकनाथ शिंदे यांचा ! जनतेने कौल देऊन शिंदे यांचीच सेना ओरिजनल असल्याचे सांगितले असले तरी उबाठा गटाला ते मान्य नाही, त्यामुळे हा डबल डबल चा प्रपंच!**



### दोन्ही ठिकाणी नवीन काहीच नाही..

दोघांचेही परवाचे मेळावे पूर्णपणे पाहिले आणि ऐकले! ‘अरे ला कारे’ आणि ‘कारे ला अरे, या पलीकडे या दोघांच्याही भाषणांमध्ये नवीन असे काहीच नव्हते. शिंदे यांच्या दृष्टीने उद्धव ठाकरे, त्यांची शिवसेना हा विषय संपलेला असेल, तर त्याला किती दिवस कुरवाळत बसणार ? आणि उद्धव ठाकरे शिंदे सेनेवर किती दिवस तेच ते भाषण करत राहणार? हा खरा प्रश्न आहे !

### वर्धापनदिन का शिमगोत्सव ..

वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी ५९ वर्षापूर्वी शिवसेनेचे रोपटे लावले.परंतु, आता दोन शकले झालेल्या शिवसेनेचा वर्धापन दिन नेहमीप्रमाणे ‘शिमगोत्सव’ सणाप्रमाणे साजरा झाला. एकनाथ शिंदे यांना शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह घटनात्मक मार्गाने मिळाल्यापासून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने दररोज त्यांच्या विरोधात वक्तव्य करण्याचा चंग बांधलेला आहे. अर्थात, ते साहजिक आहे. स्वाभाविक आहे. आज त्यामुळे त्यांचे राजकारणातील स्थान डळमळीत झाले. अनेक वर्ष बरोबर असलेले कार्यकर्ते निघून गेले. सत्ता मिळण्याचे सहज सोपे राहिले नाही. देण्यासारखे हातात नाही. घ्यायला झोळी शिल्लक नाही. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे आपला राजकीय किल्ला लढवत आहेत.

### जळफळाट मुख्यमंत्रीपदाचा..

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना आपल्या सोबत घेत, थेट मुख्यमंत्रीपदावर उडी मारल्यामुळे उद्धव ठाकरे यांचा जळफळाट होणे साहजिक आहे. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदापासून ठाकरे घराण्याने हेतूतः बाजूला ठेवले होते. एका बाजूला त्यांना चुचकारत निवडणुकीपूर्वी त्यांच्याकडून काम करून घेतले आणि शरद पवार यांच्यासोबत तडजोड करत स्वतः मुख्यमंत्री पद मिळवले. ही प्रतारणा उद्धव ठाकरे यांनी केवळ भारतीय जनता पक्षाबरोबरच केली नाही, युतीच्या मतदारांबरोबर नाही तर एकनाथ शिंदे यांच्याबरोबरही केली होते. अक्षम्य अशा चुका बाजूला ठेवत, आपणच बरोबर आहोत असे सांगून, त्यांनी अडीच वर्षाचे मुख्यमंत्रीपद भोगले. या काळात कोरोना सारखी महामारी, जागतिक संकट आल्याने आणि त्यातही त्यांच्या आजारपणामुळे उद्धव ठाकरे यांना पक्ष ताब्यात ठेवता आला नाही. मालक , अधिकारी कमजोर असतील, निर्णय घेण्यास दुबळे असतील, दुसऱ्यांवर बेभरोसा विश्वास ठेवणारे असतील, तर हाता खालील मंडळींना ही संधी असते, हे कोणीही मान्य करेल !

### एकनाथ शिंदेंकडून संधीचे सोने..

एकनाथ शिंदे यांनी या संधीचे सोने केले. दोन, अडीच वर्ष त्यांनी त्यांचे संघटन मजबूत केले. कोरोना काळात त्यावर पकड मिळवली आणि उद्धव ठाकरे यांच्या आजारपणात भारतीय जनता पार्टी आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी हात मिळवणी करत संपूर्ण शिवसेनाच ‘हायजॅक’ केली. ठाकरे यांनी या आपल्या नाकर्तेपणाला जनतेपुढे उद्धट दयनीयतेचा अविर्भाव आणून लोकसभा, विधानसभेच्या वेळी मत मागण्याचा प्रयत्न केला, भावनिक आवाहन केले. माझा पक्ष चोरला, वडिलांना चोरले, पक्ष, चिन्ह चोरले. माझ्याकडे देण्यासारखे काहीच नाही, असे उद्गार काढून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला.

### पराभवानंतर चिंतन नाही..

लोकसभा आणि विधानसभेत झालेल्या पराभवाचे चिंतन करण्याऐवजी आजही उद्धव ठाकरे हे एकनाथ शिंदे आणि त्यांच्याबरोबर भारतीय जनता पार्टी सोबत गेलेल्या आपल्याच मंडळींना शिव्या शाप देत आहेत. कदाचित, उद्या उद्धव ठाकरे यांच्याबरोबर सध्या असणारी मंडळी एकनाथ शिंदे यांच्याबरोबर जाण्याचीच शक्यता जास्त आहे. याचे कारण एकनाथ शिंदे केवळ उद्धव ठाकरे यांच्यावरच केली तर टीका करत आहेत, त्यांच्या बाकी सहकाऱ्यांवर ते फारसे बोलत नाहीत, याला खरा राजकारणी म्हणतात !

### ठाकरे गटाला गळती, शिंदेंकडे ‘इनकमिंग’ !

गेल्या सहा महिन्यात उद्धव ठाकरे यांच्या गटाला मोठ्या प्रमाणात गळती लागली असून एकनाथ शिंदेंकडे ती भरती होत आहे. काम होणे, सत्तेत राहणे, सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता मिळवणे, हे उत्तर आता उद्धव ठाकरे यांच्याबरोबर होऊ शकत नाही, हे शिवसैनिकांच्या लक्षात आले आहे. मात्र, हे उद्धव ठाकरे यांच्या लक्षात आलेले नाही. राज ठाकरे यांच्याबरोबर जुळवून घेण्यापेक्षा एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत असणारी मूळ शिवसेनेची मंडळी आपल्याबरोबर कशी येतील याचा विचार यापूर्वीच त्यांनी करायला पाहिजे होता. राज ठाकरे यांच्यामुळे उद्धव ठाकरे यांना कितपत फायदा होईल, याबाबत आजही शंकाच आहे. महाशिवरात्रिपाशी आषाढी गेली असा एक वाक्प्रचार आहे. याचा अर्थ उपाशी राहण्यापलीकडे काही होत नाही, हा आहे.

### काय चमत्कार होऊ शकतो ?

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येऊन मोठा चमत्कार होईल असे दिसत नाही. या दोघांनाही मुंबई पलीकडे देणे घेणे नाही. उर्वरित राज्य आणि राज्यातील कार्यकर्त्यांबद्दल म्हणावी तेवढी आस्था या दोघांनाही नाही. वर्षानुवर्ष अनेक मतदारसंघात हे फिरकलेले नाहीत. देशाचे अर्थकारण मुंबईतून आणि आर्थिक राजधानी मुंबई असल्याने दोघाही बंधूंना मुंबईमध्येच रस आहे. मुंबईमध्ये रस असणाऱ्यांमध्ये एकनाथ शिंदे, भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस हे सुद्धा दावेदार आहेत. साहजिकच केवळ मुंबई महानगरपालिका आणि मुंबईचे उत्पन्न यापलीकडे कोणालाच मतदार मुंबईचा विकास मुंबईकरांबद्दल प्रेम असे काही नाही.

### तीच ती जुनी टेप आणि आरोप..

भाषा, हिंदू धर्म यापलीकडे विभाजनासाठी यांच्याकडे मुद्दे नसल्याने आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे मोदी , शहा मुंबई पळवणार यापलीकडे विचार नसल्याने सर्वसामान्यांना कोणीही आले, तरी त्यांच्या जगण्यात फार मोठा बदल होईल असे वाटत नाही. मुंबईचे मूलभूत प्रश्न आणि ते सोडवण्याची इच्छा ठाकरे बंधूंना आहे, असे आजपर्यंत दिसले नाही. पक्ष फोड या पलीकडे मनसे जात नाही, तर मराठी भाषा आणि हिंदू धर्माच्या अलीकडे उद्धव ठाकरे यांना यायचे नाही. साहजिकच उद्धव ठाकरे यांच्या निशाण्यावर मोदी, शहा, शिंदे आणि त्यांची शिवसेना यापलीकडे काहीच नाही तर एकनाथ शिंदे यांना ठाकरे यांना उत्तर देणे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करणे यापलीकडे पर्याय नाही. एका पक्षाचे प्रमुख असण्याबरोबरच आपण राज्याचे उपमुख्यमंत्री आहोत, याचा विचार करून एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना पक्षाची ध्येयधोरणे, आगामी काळातील रणनीती संदर्भातील कार्यपद्धती समजावून देणे, त्यांच्या मेळाव्यातील भाषणातून अपेक्षित होते. अर्थात ‘अरे ला कारे आणि कारे ला अरे’ या पलीकडे या दोघांच्याही भाषणांमध्ये नवीन असे काहीच नव्हते. शिंदे यांच्या दृष्टीने ठाकरे, त्यांची शिवसेना हा विषय संपलेला असेल,तर त्याला किती दिवस कुरवाळत बसणार ? आणि उद्धव ठाकरे शिंदे सेनेवर किती दिवस तेच ते भाषण करत राहणार ? आता त्यांनी भूतकाळातून बाहेर पडावे आणि भविष्यकाळातल्या शिवसेना उभारणीसाठी प्रयत्न करावेत, एवढीच सूचना..गद्दार, खंजीर, कोथळा, मावळे, कावळे, छाताड भगवा, हिम्मत असेल तर.. असे शब्द उद्धव ठाकरे यांनी आपल्या शब्दकोशातून काढून टाकायला हवेत.. या मर्यादित शब्दसाठ्यांमुळे एक तर त्यांची टिंगल होऊ लागली आहे आणि त्यांची स्क्रिप्ट एखादा भाजपावालाच लिहीत असावा अशी आता शंका येऊ लागली आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रेडिओने संस्कृतीला आकार, आवाज दिला!

## रेडिओ व्यक्तिपर्यंत पोहचण्याचे सशक्त माध्यम : फडणवीस

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लहानपणी दिवसाची सुरूवात सकाळी रेडिओ ऐकण्यापासून होई. विविधभारती वाहिनीची गाणी न चुकता ऐकली जायची. त्यामुळे रेडिओशी लहानपणापासूनच जुळता आले. रेडिओवर कार्यक्रम सुरू असताना माणूस दिसत नाही, पण सचित्र दर्शन शब्दांमधून घडते. संभाषण एकतर्फी असूनही रेडिओने अभिव्यक्तीला आवाज दिला आणि संस्कृतीला आकार दिला. रेडिओ अंतिम व्यक्तिपर्यंत पोहचण्याचे सशक्त माध्यम आहे, या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेडिओच्या आठवणींना उजाळा दिला.**



जागतिक संगीत दिनानिमित्त यंदा प्रथमच 'महाराष्ट्र रेडिओ महोत्सव' व 'आशा रेडिओ पुरस्कार' सोहळ्याचे शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने शनिवारी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजन करण्यात आले होते. पहिला आशा रेडिओ जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ संगितकर विश्वनाथ ओक यांना देण्यात आला. या सोहळ्यात विविध १२ रेडिओ प्रकारात पुरस्कार देण्यात आले. राज्यात १६ रेडिओ वाहिन्या, ५८ कम्युनिटी रेडिओ वाहिन्या व ६० केंद्र अस्तित्वात आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सहा रेडिओ जॉकींनी मुलाखत घेतली.रेडिओवर संगीत ऐकणे, गाणे लिहीणे, कविता करणे आदी छंदाविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनमोकळा संवाद साधला. यावेळी फडणवीस यांनी शिघ्र कविता सादर करत गाणे गायले. संगीत आपल्या संवेदनांना जिवंत करते. आम्ही राजकारणी लोक खडूस दिसतो. पण आतून खूप चांगले लोक आहेत. त्याचे श्रेय संगीताला जाते, असेही ते म्हणाले. संगीत मानवामध्ये संवेदनशीलता आणते आणि तणावमुक्त करते. मन:स्थिती बिघडल्यास हमखास संगीत ऐकावे. मन शांत होऊन विचारक्षमता विकसित होते. रेडिओवर प्रेम करणाऱ्या असंख्य नागरिकांनी रेडिओच्या कार्यक्रमांना जीवनाचा अविभाज्य भाग बनविले आहे. रेडिओचे महत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखून शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचण्यासाठी 'मन की बात' कार्यक्रम सुरू केला. रेडिओ केवळ संगीत ऐकण्याचे साधन नाही, तर संवादाचेही माध्यम होऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले, असे फडणवीस म्हणाले. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, ज्येष्ठ गायिका महाराष्ट्र भूषण आशा भोसले, गायक सुदेश भोसले, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, संचालक विभीषण चवरे उपस्थित होते.मॉडेलिंग हा अपघात होता. मित्राने माझ्यासोबत केलेली थट्टा होती. सुदैवाने मी त्यातून वाचलो. त्यांनतर मी कधीही हिंमत केली नाही. कॉलेजमध्ये असताना कविता लिहायचो. कवी संमेलनात जायचो. अगदी लहान असताना काही कविता लिहिल्या होत्या. लिहिल्यांनंतर ते साठवून ठेवले नाही. जेव्हा वाटले तेव्हा लिहायचो. स्वत: वाचायचो. तसा मी रामदास आठवले घराण्याचा कवी आहे, अशी मार्मिक टिप्पणीही फडणवीस यांनी केली.मी दहा वर्षांची असताना चित्रपटासाठी पहिले गाणे ध्वनीमुद्रीत केले. रेडिओ नसता तर कोणताच गायक कुणाला माहिती झाला नसता. रेडिओवर जुनी गाणी लावली पाहिजेत. आपले संगीत, आपली संस्कृती नव्या पिढीला कळली पाहिजे. भारतीय संगीत नवी पिढी शिकेल, असे प्रयत्न रेडिओने केले पाहिजेत. मी गेले तरी रेडिओमुळे तुमच्या असेन, असे आशा भोसले म्हणाल्या.जागतिक संगीत दिनानिमित्त यंदा प्रथमच 'महाराष्ट्र रेडिओ महोत्सव' व 'आशा रेडिओ पुरस्कार' सोहळ्याचे शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने शनिवारी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजन करण्यात आले

### आठवले घराण्याचा कवी

होते. पहिला आशा रेडिओ जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ संगितकर विश्वनाथ ओक यांना देण्यात आला. या सोहळ्यात विविध १२ रेडिओ प्रकारात पुरस्कार देण्यात आले. राज्यात १६ रेडिओ वाहिन्या, ५८ कम्युनिटी रेडिओ वाहिन्या व ६० केंद्र अस्तित्वात आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सहा रेडिओ जॉकींनी मुलाखत घेतली. रेडिओवर संगीत ऐकणे, गाणे लिहीणे, कविता करणे आदी छंदाविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनमोकळा संवाद साधला. यावेळी फडणवीस यांनी शिघ्र कविता सादर करत गाणे गायले. संगीत आपल्या संवेदनांना जिवंत करते. आम्ही राजकारणी लोक खडूस दिसतो. पण आतून खूप चांगले लोक आहेत. त्याचे श्रेय संगीताला जाते, असेही ते म्हणाले.संगीत मानवामध्ये संवेदनशीलता आणते आणि तणावमुक्त करते.

# मालाडमधील वीज चोरी उघडकीस

## मालाडमध्ये बेकायदेशीर जोडणीद्वारे लाखोंची वीज चोरी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एका निनावी पत्रामुळे मालाडमधील चोरीचा प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी अदानी वीज कंपनीने केलेल्या कारवाईत १६ घरांना अनधिकृत वीज जोडणी दिल्याचे आढळले. याप्रकरणी बांगूर नगर पोलीस ठाण्यात वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



अदानी वीज कंपनीच्या कार्यालयात ४ जून रोजी एक निनावी पत्र आले. मालाडच्या लिंक रोड येथील शिवधाम ब्लॉकच्या मागील मुथूमरियम रहिवाशी संघ येथील अनधिकृत चाळीना बेकायदेशीर वीज जोडणी दिल्याची माहिती या पत्रात देण्यात आली होती.तशाच प्रकारची एक तक्रार कंपनीला ऑनलाईन मिळाली होती. दोन्ही तक्रारी एकाच प्रकारच्या होत्या. पत्र आणि तक्रारीची शहानिशा करण्यासाठी दक्षता अधिकारी मिहीर आफळे यांनी आपल्या पथकासह या ठिकाणी भेट दिली.

येथील १६ घरांना वीज आणि पाण्याच्या पंपाना बेकायदेशीररित्या वीज जोडणी देण्यात आली होती. सुमारे साडेसहा लाखांची २८ हजार युनीट वीज चोरी करण्यात आल्याचे यावेळी आढळले. बेकायदेशीर वीज जोडणी देणारा आरोपी निलेश हरिजन याच्याविरोधात पोलिसांनी भारतीय विद्युत अधिनियमाच्या कलम १३५, १३८, १५० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.वीज चोरी प्रकरणी दुसरी कारवाई गोरेगाव लिंक रोडवरील मोतिलाल नगर येथे करण्यात आली. आरोपी ओमप्रकाश शर्मा बेकायेदशीरित्या वीज जोडणी घेत असल्याचे आढळले. साडेतीन लाखांची वीज चोरी केल्याप्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अदानी वीज कंपनीच्या कार्यालयात ४ जून रोजी एक निनावी पत्र आले. मालाडच्या लिंक रोड येथील शिवधाम ब्लॉकच्या मागील मुथूमरियम रहिवाशी संघ येथील अनधिकृत चाळीना बेकायदेशीर वीज जोडणी दिल्याची माहिती या पत्रात देण्यात आली होती.तशाच प्रकारची एक तक्रार कंपनीला ऑनलाईन मिळाली होती.

### लाखोंची वीज चोरी

दोन्ही तक्रारी एकाच प्रकारच्या होत्या. पत्र आणि तक्रारीची शहानिशा करण्यासाठी दक्षता अधिकारी मिहीर आफळे यांनी आपल्या पथकासह या ठिकाणी भेट दिली. येथील १६ घरांना वीज आणि पाण्याच्या पंपाना बेकायदेशीररित्या वीज जोडणी देण्यात आली होती२८ हजार युनीट वीज चोरी करण्यात आल्याचे यावेळी आढळले. बेकायदेशीर वीज जोडणी देणारा आरोपी निलेश हरिजन याच्याविरोधात पोलिसांनी भारतीय विद्युत अधिनियमाच्या कलम १३५, १३८, १५० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.वीज चोरी प्रकरणी दुसरी कारवाई गोरेगाव लिंक रोडवरील मोतिलाल नगर येथे करण्यात आली. आरोपी ओमप्रकाश शर्मा बेकायेदशीरित्या वीज जोडणी घेत असल्याचे आढळले. साडेतीन लाखांची वीज चोरी केल्याप्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खामेनींची 3 दशकांची राजवट संपणार?

## उत्तराधिकाऱ्यांची नावं केली जाहीर, मुलाचं नाव वगळलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इस्रायल-इराणमधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत चालल्याचं दिसून येत आहे. इस्रायल आणि इराण या दोन्ही देशांकडून हवाई हल्ले करण्यात येत आहेत. इस्त्रायलने इराणमधील तेहरानला टार्गेट करत हवाई हल्ले केले, तर इराणने इस्रायलमधील काही शहरांना टार्गेट करत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागले आहेत. या दोन्ही देशातील संघर्ष थांबण्याचं नाव घेत नाहीये. इराण-इस्रायलमधील तणाव शिगेला पोहोचला असतानाच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.**

या मागचं कारण म्हणजे इस्रायल आणि इराणच्या संघर्षात खामेनी यांनी 'विनाअट शरणगती' पत्करावी असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मात्र, त्यांचा हा इशारा खामेनी यांनी धुडकावून लावला. एवढंच नाही तर इस्रायलशी हातमिळवणी करत अमेरिकेने इराणवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तर अमेरिकेला कधीही न भरून निघणारं नुकसान सहन करावं लागणार असल्याचा इशाराच खामेनी यांनी दिला होता.दरम्यान, इराकचे माजी नेते सद्दाम हुसैन यांच्याप्रमाणेच खामेनी यांची अवस्था होऊ शकते अशी धमकी इस्रायलने दिल्यामुळे अयातुल्ला अली खामेनी यांची हत्या होऊ शकते म्हणून खामेनी यांनी बंकरमध्ये आश्रय घेतल्याचं बोललं जात आहे. तसेच अयातुल्ला खामेनी यांनी इराणच्या सर्वोच्च नेत्यासाठी उत्तराधिकाऱ्यांची नावं जाहीर केल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे. अयातुल्ला अली खामेनी यांनी इराणच्या सर्वोच्च नेत्यासाठी उत्तराधिकाऱ्यांची नावं जाहीर केले असून त्या नावामधून त्यांच्या मुलाचं नाव गायब असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे आता अयातुल्ला खामेनी यांची ३ दशकांची राजवट



संपणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच खामेनी यांनी इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांद्वारे संवाद साधणं देखील सोडलं असून आपल्या विश्वासू लोकांमार्फत संवाद साधत असल्याचंही समोर आलं आहे.इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी इराण-इस्रायल संघर्ष सुरू झाल्यानंतर आता एक मोठं पाऊल उचलत संभाव्य उत्तराधिकारी म्हणून तीन वरिष्ठ धर्मगुरूंची नावं दिल्याचं वृत्त समोर आलं आहे. मात्र, कोणते तीन नावं जाहीर करण्यात आले, याबाबत अद्याप सांगण्यात आलेलं नाही. वृत्तानुसार, खामेनी यांचे पुत्र मोज्तबा जे एक धर्मगुरू देखील आहेत. पण त्यांचं उत्तराधिकारींच्या यादीतून नाव वगळण्यात आलं आहे. दरम्यान, इराणी अधिकाऱ्यांचा हवाला देत वृत्तात म्हटलं आहे की खामेनी एका सुरक्षित भूमिगत बंकरमध्ये असून ते त्यांना देण्यात आलेल्या हत्येच्या धमकीबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.८६ वर्षीय अयातुल्ला अली खामेनी हे इराणचे सर्वोच्च नेते आहेत. देशाचे परराष्ट्र धोरण असो की ऊर्जा धोरण यासंदर्भातील अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार खामेनी यांच्याकडेच आहे. १९८९ मध्ये अयातोल्ला रुहोल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यांनी इराणच्या सर्वोच्च नेतेपदाची सूत्रे स्वीकारली. जवळपास तीन दशकांपासून खामेनी हे इराणवर एकहाती वर्चस्व गाजवित आहेत. इराणमधील एक अख्खी पिढी त्यांच्या नेतृत्वाशिवाय देशाच्या विकासाची कल्पनाही करीत नाही. खामेनी हे इराणचे प्रमुख आहेतच, पण त्याचबरोबर ते इराणी रिव्होल्यूशनरी गार्ड कोअरचे (आयआरजीसी) कमांडर-इन-चीफही आहेत, या सर्व अधिकारांमुळे खामेनी हे इराणचे सर्वात शक्तिशाली नेते आहेत.१९३९ मध्ये इराणच्या मशहद या शहरातील एका धार्मिक कुटुंबात खामेनी यांचा जन्म झाला. त्यांनी मशहदमधील मदरशांमध्ये धार्मिक शिक्षण घेतले आणि नंतर ते पुढील शिक्षणासाठी कोम शहरात गेले. १९६२ पासून खामेनी यांनी इराणचे तत्कालीन सम्राट मोहम्मद रझा पहलवी (शहा) यांच्या विरोधात राजकीय हालचाली सुरू केल्या. अयातुल्ला अली खामेनी यांना इराणच्या इस्लामी क्रांतीच्या आधी अनेकदा तुरुंगवासही भोगावा लागला. १९६० च्या दशकात ते काही काळ देशाबाहेर हद्दपारी झाले होते, पण १९७९ च्या क्रांतीनंतर ते पुन्हा इराणमध्ये परतले. इराणच्या क्रांतीनंतर खामेनी यांना सत्तेच्या केंद्रस्थानी आले.

### 'धर्मगुरू ते शक्तिशाली नेता'

या मागचं कारण म्हणजे इस्रायल आणि इराणच्या संघर्षात खामेनी यांनी 'विनाअट शरणगती' पत्करावी असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मात्र, त्यांचा हा इशारा खामेनी यांनी धुडकावून लावला. एवढंच नाही तर इस्रायलशी हातमिळवणी करत अमेरिकेने इराणवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तर अमेरिकेला कधीही न भरून निघणारं नुकसान सहन करावं लागणार असल्याचा इशाराच खामेनी यांनी दिला होता. दरम्यान, इराकचे माजी नेते सद्दाम हुसैन यांच्याप्रमाणेच खामेनी यांची अवस्था होऊ शकते अशी धमकी इस्रायलने दिल्यामुळे अयातुल्ला अली खामेनी यांची हत्या होऊ शकते.

# इराणचा आणखी एक कमांडर हल्ल्यात ठार

## 7 ऑक्टोबरच्या हल्ल्याचा प्रमुख सूत्रधार असल्याचा आरोप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या आठवड्यापासून इस्रायल सातत्याने इराणवर हल्ले करत आहे. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत अनेक इराणी कमांडर ठार झाले आहेत. आता इस्रायलने इराणच्या आणखी एका कमांडरला ठार केले आहे. याबाबतची माहिती इस्रायलच्या संरक्षण दलाने दिली आहे.**



इस्रायली संरक्षण दलाने त्यांच्या अधिकृत हँडलवर म्हटले आहे की, “इराणच्या इस्रायल नष्ट करण्याच्या योजनेचे प्रमुख सईद इजादी, कोम परिसरात केलेल्या एका हल्ल्यात ठार झाला आहे.”संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इजादी यांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. दरम्यान, आयडीएफने शुक्रवारी रात्रभर कोममध्ये हल्ले केले आहेत. इस्रायली संरक्षण दलाने इजादी यांना इराणच्या इस्रायल नष्ट करण्याच्या योजनेचे प्रमुख म्हटले आहे, यावरून इजादी इराणसाठी किती महत्त्वाचे होते हे लक्षात येते.इस्रायली सैन्याच्या म्हणण्यानुसार, इजादी हे कुद्स फोर्सच्या पॅलेस्टिनी कॉर्प्सचे कमांडर होते. ते इराण आणि हमास यांच्यातील मुख्य समन्वयक होते आणि ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलवल केलेल्या हल्ल्याच्या मुख्य सूत्रधारांपैकी एक होते. दरम्यान हमासने ७ ऑक्टोबर २०२३ मध्ये इस्रायलवर केलेल्या हल्ल्यात १,२०० लोक मारले गेले होते. विशेष म्हणजे या हल्ल्यानंतरच गाझामध्ये युद्ध सुरू झाले होते, जे अजूनही सुरू आहे. या युद्धाच आतापर्यंत ५४,००० हून अधिक पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायली लष्कराने म्हटले आहे की, “तो (इजादी) आयआरजीसी आणि हमास नेत्यांमधील लष्कराचे समन्वयक म्हणून काम करत असे. दहशतवादी कारवायांसाठी हमासला इराणकडून आर्थिक मदत पुरवण्याची जबाबदारीही इजादीकडे होती.” इजादी यांच्यावर हमासच्या लष्करी शाखेचे पुनरुज्जीवन करण्याचा आणि गाझामध्ये हमासची सत्ता कायम राहावी यासाठी प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

### इजादी इराणसाठी किती महत्त्वाचे

इस्रायली परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले की, ७ ऑक्टोबरच्या हल्ल्यापूर्वी इजादी यांनी हमासला निधी आणि शस्त्रे पुरवली होती. त्यांनी इजादी यांचा मृत्यू इस्रायलच्या गुप्तचर संस्थांचे एक मोठे यश असल्याचे म्हटले आहे.इस्रायली संरक्षण दलाने त्यांच्या अधिकृत हँडलवर म्हटले आहे की, “इराणच्या इस्रायल नष्ट करण्याच्या योजनेचे प्रमुख सईद इजादी, कोम परिसरात केलेल्या एका हल्ल्यात ठार झाला आहे.”संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इजादी यांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. दरम्यान, आयडीएफने शुक्रवारी रात्रभर कोममध्ये हल्ले केले आहेत. इस्रायली संरक्षण दलाने इजादी यांना इराणच्या इस्रायल नष्ट करण्याच्या योजनेचे प्रमुख म्हटले आहे, यावरून इजादी इराणसाठी किती महत्त्वाचे होते.

# सोनाक्षी सिन्हाच्या लग्नात दोन्ही भावांची होती गैरहजरी?

गेल्यावर्षी २३ जून रोजी बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाने झहीर इक्बालबरोबर लग्नगाठ बांधली. या जोडप्याने नोंदणीकृत विवाह केला आणि एकमेकांबरोबर नवीन आयुष्य सुरू करण्याचा निर्णय घेतला. सोनाक्षी आणि झहीरच्या लग्नानंतर काहींनी या विवाहाचे समर्थन केलं होतं, तर कोणी या लग्नाविरोधात बोललं. या चर्चांसह हे लग्न त्यांच्या काही कौटुंबिक मतभेदांमुळेही चर्चेत आले होते.सोनाक्षी लग्नात वडील शत्रुघ्न सिन्हा व आई पूनम सिन्हा यांनी हजेरी लावली होती. पण लव व कुश हे दोघे भाऊ बहिणीच्या लग्नात सहभागी झाले नाहीत अशा अनेक चर्चा सोशल मीडियावर रंगल्या होत्या. लवने सोनाक्षीच्या लग्नातील अनुपस्थितीबद्दल प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर कुशनेही सांगितले होते की, तोदेखील बहीणीच्या लग्नाला उपस्थित होता. अशातच आता कुशने पुन्हा एकदा यावर उत्तर दिलं आहे. न्यूज१८ ला दिलेल्या एका खास मुलाखतीत, कुशने सोनाक्षीच्या लग्नात गैरहजर असल्याचं वृत्त नाकारलं. याबद्दल कुश म्हणाला, "माझ्या बहिणीच्या लग्नाला मी उपस्थित न राहिल्याबद्दल खूप चर्चा झाली होती. पण याबद्दल सांगायचं झालं तर ती खोटी बातमी होती. मला माहित नाही की, या चर्चा कोणी केल्या होत्या. पण मी गेल्या वर्षीच याचं स्पष्टीकरण दिलं होतं



की, मी लग्नात उपस्थित होतो."यापुढे कुश म्हणाला, "मी एवढेच सांगेन की, सोनाक्षी माझी बहीण आहे आणि मी तिचा आदर करतो. तिच्यावर माझं प्रेम आहे. मी तिच्या लग्नात का नसेन?" यापुढे त्याने सोशल मीडियावरील ट्रोलिंगबद्दलही मत व्यक्त केलं. याबद्दल कुश म्हणाला, "ट्रोलिंगचा मला काही त्रास होत नाही किंवा त्याचा माझ्यावर काहीच परिणाम होत नाही."यानंतर कुशने म्हटलं, "माझ्यावर टीका करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला उत्तर देण्याची मला गरज वाटत नाही. मी माझ्या मित्रांच्या आणि माझ्या जवळच्या लोकांच्या मतांनाच महत्त्व देतो. मी माझ्या वडिलांना खूप काही सहन करताना पाहिले आहे. त्यामुळे या सगळ्या नकारात्मक चर्चांना कसं उत्तर द्यायचं हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो आहोत."दरम्यान, सोनाक्षी सिन्हा व झहीर इक्बाल यांनी २३ जून २०२४ रोजी लग्न केलं. जवळपास ७ वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

## अहमदाबाद विमान अपघातात कंपनीची चूक होती का?

अहमदाबाद विमान दुर्घटनानंतर गौरव तनेजा रोज या घटनेबद्दलचे अपडेट्स देत आहे. गौरवने याआधीच्या एका व्हिडीओमध्ये सांगितले होते की, हा अपघात इंजिनातील बिघाडामुळे झाला असावा. त्यानंतर त्याने ओव्हरलोडिंग हेदेखील या अपघाताचे कारण असू शकतं, असा अंदाजही वर्तवला.
आता त्याने पुन्हा नवा व्हिडीओ शेअर करीत काही माहिती दिली आहे. नवीन व्हिडीओमध्ये गौरव म्हणतो, "खराब हवामान असताना वैमानिकांना उड्डाण उशिरा करण्याचा किंवा उड्डाण रद्द करण्याचा इशारा मिळतो. ७८७ या फ्लाइटमध्ये एक डावीकडे आणि एक उजवीकडे, असे दोन हवामानविषयक रडार आहेत. सुरक्षितता आणि कार्यक्षमता व्यवस्थित असल्यानंतर उड्डाणासाठी या दोनपैकी एक तरी रडार कार्यरत असणं आवश्यक आहे.

## 'महाराज'ला एक वर्ष पूर्ण

अभिनेत्री शर्वरी वाघ २०२४ रोजी आलेल्या 'महाराज' या चित्रपटातून झळकली होती. त्यामध्ये तिच्यासह आमिर खानचा मुलगा जुनैद खान मुख्य भूमिकेत झळकला होता. शर्वरी व जुनैद यांच्या जोडीने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्यातील संवाद, चित्रपटातील गाणी या सगळ्या गोष्टींमुळे दोघांमधील केमिस्ट्री फुलून आली. या चित्रपटातून पहिल्यांदाच जुनैद व शर्वरीने एकत्र काम केलं होतं. आदित्य चोप्रा निर्मित 'महाराज' हा चित्रपट २१ जून २०२४ रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला होता. त्यावेळी चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. आज या चित्रपटाला प्रदर्शित होऊन पूर्ण एक वर्ष झले आहे. त्यानिमित्त चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकलेली अभिनेत्री शर्वरी वाघ हिने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट शेअर करीत भावना व्यक्त केल्या आहेत.इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करीत शर्वरीने चित्रपटाच्या आठवणींना उजाळा दिला आहे. यावेळी तिने पोस्टखाली कॅप्शनमध्ये तिच्या भावना व्यक्त करत म्हटले आहे, "हाँ के हाँ, हा चित्रपटातील एक संवाद माझ्यासाठी एक भावना झाली आहे.



## तर आता घटस्फोट देईन!

'लग्नानंतर होईलच प्रेम' मालिकेत काव्या-पार्थ आणि जीवा-नंदिनीचं लग्न एकमेकांच्या मनाविरुद्ध झालेलं आहे. मात्र, आता या चौघांनी परिस्थितीशी जुळवून घेण्याचा निर्णय घेतला आहे. काव्याने नुकतंच जीवाबरोबरचं प्रेमाचं नातं संपवून टाकल्याचं पाहायला मिळालं. काव्या पार्थसाठी वटपौर्णिमेची पूजा करते आणि जीवाला थेट सांगते, "माझ्यासाठी यापुढे तू फक्त ताईचा नवरा असशील" असं सांगते. याशिवाय काव्या आता सगळं विसरून पुन्हा एकदा स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करायला घेते.पार्थ काव्याला पुन्हा एकदा अभ्यास करताना पाहून प्रचंड खूश होतो. तो तिच्या अभ्यासाविषयी चौकशी करतो. यावेळी काव्या त्याला म्हणते, "मी आता सगळं विसरून सरळ मार्गाने चालायचं ठरवलं आहे"तर, दुसरीकडे नंदिनी जीवाचं कपाट उघडते. यावेळी त्याच्या कपाटातून काव्याने दिलेली भेटवस्तू पडते आणि फुटते. यावेळी जीवाला पटकन जाग येते आणि तो सगळा राग नंदिनीवर काढतो. "आमच्या प्रेमाची शेवटची आठवण होती.. ती सुद्धा आज तुझ्यामुळे उद्धवस्थ झाली" असं तो नंदिनीला सुनावतो. जीवाचं हे रुप पाहून नंदिनी प्रचंड बिथरते. तिला अश्रू अनावर होतात... जीवाच्या या वागण्यामुळेच मालिकेत नंदिनी एक मोठा निर्णय घेणार आहे. ती जीवाला घटस्फोट द्यायला तयार होणार आहे. इतकंच नव्हे तर नंदिनी याबद्दल थेट जीवाला जाब विचारून कायमचा सोक्षमोक्ष लावणार आहे. नंदिनी जीवाला म्हणते, "जीवा तुम्ही फक्त म्हणा...नंदिनी दे मला घटस्फोट, मी तुम्हाला मोकळं करेन. तुमच्या आणि त्या मिस 'K'च्या डोक्यावर मी स्वत: अक्षदा टाकेन. फक्त एकदा मनापासून मला सांगा... तुम्हाला माझ्यापासून घटस्फोट हवाय का?" आता नंदिनीच्या या प्रश्नावर जीवा काय उत्तर देणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.दरम्यान, साध्याभोळ्या नंदिनीचं हे



## आरजेने स्क्रीनशॉट शेअर करत ट्रोलर्सना उत्तर दिलं

सोशल मीडियावर ट्रोल होणे आता एक सामान्य गोष्ट झाली आहे; परंतु काही स्टार्स असे आहेत, ज्यांना प्रत्येक आरोपाला योग्य उत्तर कसे द्यायचे हे माहीत आहे. आरजे माहवशनेही असेच काहीसे केले आहे. अलीकडेच तिला पुन्हा एकदा सोशल मीडियावर "यूजीभाई ने इसका करिअर बना दिया", असे म्हणत ट्रोल करण्यात आले. पण यावेळी आरजे माहवश गप्प बसली नाही. तिने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट करून, त्याचे योग्य उत्तर दिले आहे.'यूजीभाई ने इसका करिअर बना दिया' या कमेंटचा स्क्रीनशॉट तिने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. याच ट्रोलरला सडेतोड उत्तर देत माहवश २०१९ पासून इंडस्ट्रीत काम करत आहे याचे पुरावेच दाखवते. या पोस्टला तिने, 'जोपर्यंत तुम्ही स्वतःसाठी बोलणार नाही, तोपर्यंत कोणीही तुमच्यासाठी बोलणार नाही', अशी कॅप्शन दिली. व्हिडीओमध्ये माहवश म्हणाली, "मी २०१९ पासून या इंडस्ट्रीत आहे. याआधी मी काय केले आहे, ते मी तुम्हाला दाखवते." व्हिडीओमध्ये ती २०२३ मध्ये प्रॉडक्शन हाऊसमधील पदार्पणाची आणि नवाजुद्दीन सिद्दीकीबरोबरच्या 'सेक्शन १०८' चित्रपटाची झलकदेखील दाखवते.दुसऱ्या एका कमेंटला उत्तर देताना माहवश म्हणाली, "छोटू, तू जन्मालाही आला नव्हतास तेव्हापासून मी क्रिकेट शो होस्ट करते आहे". मोहम्मद कैफ, शेन वॉटसन व हरभजन सिंग यांसारख्या दिग्गज क्रिकेटपटूंना भेटताना दिसत आहे. यूजीभाईमुळे ती मोठ्या लोकांना भेटू लागली आहे या कमेंटवर, माहवशने अनेक बॉलीवूड सेलिब्रिटींबरोबरचे फोटो शेअर केले आहेत. त्यामध्ये ती आयुष्मान खुराणा, बादशाह, राजपाल यादव, मनोज वाजपेयी यांच्याबरोबर दिसत आहे.

# तुमच्यात स्पोर्ट्समन स्पिरिट कुठेय?

## धावताना दोन्ही फलंदाज जोरदार धडकले अन् पडले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. या स्पर्धेतील एलिमिनेटरच्या सामनात रायगड रॉयल्स आणि पीबीजी कोल्हापूर टस्कर्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात विकी ओस्तवालने दमदार ७४ धावांची खेळी केली. या खेळीच्या रायगड रॉयल्स संघाने ६ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.**



सोशल मीडियावर व्हायरल होत असलेला हा व्हिडीओ पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. कारण दोन्ही फलंदाजांमध्ये धाव घेत असताना जोरदार टक्कर झाली. ही धडक इतकी जोरदार होती की, दोन्ही फलंदाज मैदानावर पडले. आता दोन्ही फलंदाज मैदानावर पडल्यानंतर गोलंदाजी करत असलेल्या संघाने खेळभावना दाखवणं गरजेचं होतं. मात्र, क्षेत्ररक्षण करत असलेल्या संघाने दोन्ही फलंदाजांना धावबाद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघांनाही धावबाद करण्यात यश आलं नाही. त्यामुळे क्षेत्ररक्षण करत असलेल्या संघाला ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे.तर झाले असे की, रायगड रॉयल्स आणि पीबीजी कोल्हापूर टस्कर्स यांच्यात झालेल्या सामन्यात रायगड रॉयल्स संघातील फलंदाजाने शॉट मारताच धाव घेण्याचा प्रयत्न केला. धावत असताना दोघांनीही एकमेकांकडे पाहिलं नाही. त्यामुळे दोघांमध्ये जोरदार धडक झाली. धडक होताच फलंदाज मैदानावर आपटल्यानंतर क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाने संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. आधी कोल्हापूर संघातील क्षेत्ररक्षकांनी नॉन स्ट्राईकला थ्रो मारला,पण हा थ्रो हुकला. त्यानंतर स्ट्राईकच्या दिशेने थ्रो मारला.

दोन्ही फलंदाज बाद होण्यापासून थोडक्यात बचावले. राहुल त्रिपाठीच्या थ्रो मुळे फलंदाजी करत असलेल्या संघाला ओव्हर थ्रो मुळे ४ अतिरिक्त धावा मिळाल्या. या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना कोल्हापूरने २० षटकांअखेर ७ गडी बाद १६४ धावा केल्या. कोल्हापूरकडून फलंदाजी करताना अंकित बावने ५० चेंडूंचा सामना करत ५७ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने २ षटकार आणि २ चौकार मारले.रायगड संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना विक्की ओस्तवालने ७४ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ११ चौकार आणि १ षटकार मारला.

### दोघांमध्ये जोरदार धडक झाली

धडक होताच फलंदाज मैदानावर आपटल्यानंतर क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाने संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. आधी कोल्हापूर संघातील क्षेत्ररक्षकांनी नॉन स्ट्राईकला थ्रो मारला,पण हा थ्रो हुकला. त्यानंतर स्ट्राईकच्या दिशेने थ्रो मारला. दोन्ही फलंदाज बाद होण्यापासून थोडक्यात बचावले. राहुल त्रिपाठीच्या थ्रो मुळे फलंदाजी करत असलेल्या संघाला ओव्हर थ्रो मुळे ४ अतिरिक्त धावा मिळाल्या. या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना कोल्हापूरने २० षटकांअखेर ७ गडी बाद १६४ धावा केल्या. कोल्हापूरकडून फलंदाजी करताना अंकित बावने ५० चेंडूंचा सामना करत ५७ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने २ षटकार आणि २ चौकार मारले.रायगड संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६५ धावा करायच्या होत्या.

यासह कोल्हापूरने हा सामना ६ गडी राखून आपल्या नावावर केला.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेला हा व्हिडीओ पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. कारण दोन्ही फलंदाजांमध्ये धाव घेत असताना जोरदार टक्कर झाली. ही धडक इतकी जोरदार होती की, दोन्ही फलंदाज मैदानावर पडले. आता दोन्ही फलंदाज मैदानावर पडल्यानंतर गोलंदाजी करत असलेल्या संघाने खेळभावना दाखवणं गरजेचं होतं. मात्र, क्षेत्ररक्षण करत असलेल्या संघाने दोन्ही फलंदाजांना धावबाद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघांनाही धावबाद करण्यात यश आलं नाही. त्यामुळे क्षेत्ररक्षण करत असलेल्या संघाला ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे.तर झाले असे की, रायगड रॉयल्स आणि पीबीजी कोल्हापूर टस्कर्स यांच्यात झालेल्या सामन्यात रायगड रॉयल्स संघातील फलंदाजाने शॉट मारताच धाव घेण्याचा प्रयत्न केला. धावत असताना दोघांनीही एकमेकांकडे पाहिलं नाही. त्यामुळे दोघांमध्ये जोरदार धडक झाली.

# संजय मांजरेकरांचा विराटला टोमणा?

## मांजरेकरांनी नाव न घेताच विराट कोहलीवर निशाणा साधला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना हेडिंग्लेच्या मैदानावर सुरू आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंड्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णज घेतला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने दमदार फलंदाजी केली. भारताकडून केएल राहुल यशस्वी जैस्वाल यांनी ९१ धावांची सलामी दिली.**

ज्यावेळी केएल राहुल फलंदाजी करत होता त्यावेळी समालोचन करत असलेल्या संजय मांजरेकरांनी असं काही म्हटलं, ज्यामुळे सोशल मीडियावर चांगलाच वाद पेटला आहे. पहिल्या कसोटी सामन्यातील पहिल्या दिवशी केएल राहुल फलंदाजी करत असताना संजय मांजरेकर समालोचन करत होते. त्यावेळी ते म्हणाले, ” दोन्ही फलंदाज ऑफ साईडच्या बाहेर जाणारे चेंडू सोडून देत आहेत. जैस्वालनेही असंच केलं आहे. जो फुल लेंथ चेंडू स्टंपच्या दिशेने आला त्या चेंडूवर त्याने ड्राईव्ह मारली आहे. जो चेंडू स्टंपपासून खूप दूर आहे त्या चेंडूवरही दोघांनी धावा जमा केल्या आहेत. पण केएल राहुलने आतापर्यंत एकही चेंडू सोडलेला नाही जो फुल लेंथ असेल आणि ऑफ स्टंपच्या



बाहेर जात असेल. पण जो चेंडू ऑफ स्टंपपासून खूप बाहेर आहे त्यावर त्याने कव्हर ड्राईव्ह मारली आहे.”संजय मांजरेकरांनी नाव न घेताच विराट कोहलीवर निशाणा साधला आहे. विराट कोहली अनेकदा ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर झेलबाद झाला आहे. समालोचन करताना ते पुढे म्हणाले, ” तुम्ही आता जे काही पाहत आहात, ते या दोन्ही फलंदाजांची बुद्धिमत्ता दर्शवते. यांच्या बुद्धिमत्तेला मी सलाम करतो. आपल्याला एक माजी फलंदाज माहित आहे जो ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर शॉट खेळायचा प्रयत्न करायचा आणि अडचणीत

### जैस्वालनेही असंच केलं आहे

ज्यामुळे सोशल मीडियावर चांगलाच वाद पेटला आहे.पहिल्या कसोटी सामन्यातील पहिल्या दिवशी केएल राहुल फलंदाजी करत असताना संजय मांजरेकर समालोचन करत होते. त्यावेळी ते म्हणाले, ” दोन्ही फलंदाज ऑफ साईडच्या बाहेर जाणारे चेंडू सोडून देत आहेत. जैस्वालनेही असंच केलं आहे.

यायचा.”विराट कोहलीबद्दल कोणीही वाईट कमेंट करत असेल हे विराट कोहलीच्या फॅन्सला मुळीच आवडत नाही. संजय मांजरेकरांनी हे वक्तव्य करताच, नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं . भारतीय संघाकडून फलंदाजी करताना सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने १०१ धावांची खेळी केली. केएल राहुलने ४२ धावांची खेळी केली. तर शुबमन गिल १४७ आणि ऋषभ पंतने १३३ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ४७१ धावा केल्या आहेत. ज्यावेळी केएल राहुल फलंदाजी करत होता.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 22 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# राष्ट्रवादीतर्फे गाथा सन्मानाची-कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव!

## जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा प्रा कविता आल्हाट यांच्या वतीने “गाथा सन्मानाची” या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.**



सदर सन्मान सोहळा गोदावरी आंगण, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या, विशेषतः परिचारिका, शिक्षिका, ब्युटीशियन, पोलीस कॉन्स्टेबल, तसेच इतर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना शहर अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.महिलांसाठी विविध खेळांचे, कलागुणांचे प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

### महिलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न...

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सेलच्या प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदद पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या “गाथा सन्मानाची” या उपक्रमाद्वारे महिलांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

---

# ‘निर्भय कन्या’ अभियानामधून

# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय - डॉ. किर्ती धारवाडकर

## शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये निर्भय कन्या अभियान संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने एसबीपीआयएम येथे “निर्भय कन्या अभियान” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वरिष्ठ संबंध व्यवस्थापक दिपाली महाजन, सह प्रा.डॉ.काजल माहेश्वरी,डॉ.रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात ‘इंट्रोडक्शन टू द वर्ल्ड ऑफ इन्व्हेस्टमेंट- एक गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम’ या विषयावर दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय बँकिंग आणि राष्ट्रीय वितरण वाहिनीचा अवलंब करून विद्यार्थिनींना जीवनात स्वतंत्रता, वेळेची बचत आणि गुंतवणूक करून करिअर मध्ये स्थिरता कशी आणता येते. विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन आणि विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. काजल माहेश्वरी यांनी ‘वैयक्तिक सुरक्षा’ या विषयावर मार्गदर्शन केले. वैयक्तिक सुरक्षा वाढविण्यासाठी लागणारी धोरणे, स्व-संरक्षण तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव विद्यार्थिनींना करून दिली. कोणत्याही परिस्थितींमध्ये सुरक्षित राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे दिली.

समारोप प्रसंगी डॉ. रूपाली कुदरे यांनी ‘मानसिक आरोग्य व्यवस्थापन’ या विषयावर मानसिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन तंत्र, जागरूकता, सकारात्मक विचार, स्वतःची काळजी घेण्याच्या धोरणांवर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याच्या आव्हानांना ओळखण्याच्या आणि त्यांचा सामना करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी वक्त्यांना गुंतवणूक धोरणे,वैयक्तिक सुरक्षा उपाय आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्न विचारले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उत्कृष्ट कार्यक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा
₹ १३००/-
'C++' भाषा
₹ १३००/-
बेसिक जावा
₹ १३००/-
स्क्रॅच
ॲनिमेशन
₹ १३००/-
बेसिक टॅली
₹ १५००/-
एम.एस.
ऑफिस
₹ १५००/-
कोरल ड्रॉ
₹ ११००/-
Adobe AB
फोटोशॉप
₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर
शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा.
अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

।पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

